|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

**(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव)**

(Formerly North Maharashtra University, Jalgaon)

जा.क्र.कबचौउमवि/७-अ/१६२१/२०२१ दिनांक: २३.०७.२०२१

प्रति,
मा.प्राचार्य,
श्रीकृष्ण ट्रस्टचे वास्तुशास्त्र महाविद्यालय,
जळगाव.

**विषय** :- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील उन्हाळी सत्रात पदवी स्तरावरील वास्तुशास्त्र अभ्यासक्रमाच्या **माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये होणाऱ्या सत्र- १ ते ८ च्या प्रवेशित नियमित/ पुर्न परीक्षार्थी विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज सादर करण्याबाबत...**

**संदर्भ**:-१) विद्यापीठाचे परिपत्रक क्र. ७६/२०२१,जा.क्र.उमवि/७-अ/माहे मे, जून,जुलै-२०२१/ ९१४/२०२१, दिनांक ०३/०५/२०२१.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यांत येते की, विद्यापीठाच्या संदर्भिय क्र.०१ च्या परिपत्रकान्वये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील उन्हाळी सत्रातील माहे ऑगस्ट-२०२१ मध्ये होणाऱ्या परीक्षांकरीता विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये / परिसंस्थांसाठी परीक्षा अर्ज सादर करण्याबाबतचा कार्यक्रम, आवश्यक त्या सर्व सुचनांसह कळविण्यात आलेला आहे. वास्तुशास्त्र अभ्यासक्रमाचा निकाल जाहीर झाल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज सादर करणेसाठी पुरेसा वेळ देण्यात येईल, याबाबतही कळविण्यात आले आहे.

उपरोक्त अनुषंगाने वास्तुशास्त्र अभ्यासक्रमाच्या पदवी स्तरावरील सत्र- १ ते ८ च्या नियमित/ पुर्न परीक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी माहे ऑगस्ट-२०२१ मध्ये होणा-या परीक्षांकरिता परीक्षा अर्ज सादर करण्याबाबतचे वेळापत्रक, या पत्रासोबत जोडलेल्या सहपत्रात देण्यात आले असून, त्यात नमूद केलेला अभ्यासक्रम व परीक्षा अर्ज सादर करण्याची तारीख याबाबत कृपया नोंद घ्यावी, तसेच सदर बाब सर्व संबंधितांच्या व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देऊन, परीक्षा अर्ज भरण्याची कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती. कोवीड-१९ चा प्रादुर्भाव लक्षात घेता, विद्यार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने शुल्कासह अर्ज भरण्यास सांगावे. सदर प्रयोजनासाठी कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांना महाविद्यालयात बोलावू नये, ही विनंती.

विद्यापीठाने संदर्भिय परिपत्रक क्र.१ मध्ये नमूद परीक्षा अर्ज सादर करण्यासंदर्भात दिलेल्या सर्व सुचनांचे व सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार मुदतीचे कोटेकोरपणे पालन करुन, परीक्षा अर्ज भरावेत, ही विनंती.

आपला विश्वासू,
सही/-
(डॉ.किशोर एफ.पवार)
प्र.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

सोबत:- परीक्षा अर्ज सादर करण्याबाबतचे वेळापत्रक (सहपत्र).

।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**विद्यापीठ पत्र कबचौउमवि/७-अ/परीक्षा अर्ज/१६२१/२०२१, दिनांक २३/०७/२०२१ चे सहपत्र (विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा)**

सर्व संबंधितांना या पत्राव्दारे कळविण्यात येते की, **सन २०२१ च्या प्रथमार्धात** माहे मे, २०२१ (ऑगस्ट-२०२१ मध्ये होणा-या ) मध्ये वास्तुशास्त्र वर्गाच्या परीक्षांचा कार्यक्रम खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे असून त्यात नमूद केलेल्या तारखांना परीक्षा अर्ज विद्यार्थ्यांकडून भरुन घेऊन संबंधीत विभागात पाठवावेत.

| अ.क्र. | परीक्षेचे नाव | विलंब शुल्क विरहित परीक्षा अर्ज भरण्याची अंतिम तारीख (विद्यार्थ्यांसाठी) | रु. ५०/- विलंब शुल्कासह परीक्षा अर्ज भरण्याची अंतिम तारीख (विद्यार्थ्यांसाठी) | केंद्रिय मुल्यमापन शुल्क | पासिंग सर्टीफिकेट शुल्क (अंतिम वर्ष/ सत्रासाठी) | गुणपत्रक शुल्क | परीक्षा शुल्क | विलंब शुल्क विरहित परीक्षाअर्ज Online Inward करण्याची अंतिम तारीख (सर्व महाविद्यालयांसाठी) | विलंब शुल्क विरहित परीक्षा अर्ज विद्यापीठ कार्यालयास सादर करण्याची अंतिम तारीख (महाविद्यालयांसाठी) | विलंब शुल्कासह परीक्षा अर्ज विद्यापीठ कार्यालयास सादर करण्याची अंतिम तारीख (महाविद्यालयांसाठी) | परीक्षा प्रारंभ होण्याची संभाव्य तारीख (महाविद्यालयांसाठी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | प्रथम/व्दितीय/तृतीय / चतुर्थ व पाचवे वर्ष वास्तुशास्त्र | ३०/०७/२०२१ | ०३/०८/२०२१ | रु. १००/- (प्रती सत्र) | * रु. ८०/- | रु. ८०/- | नियमित रु. ९०० /- (प्रती सत्र)<br>रिपीटर रु.५००/- (प्रती सत्र) | ०३.०८.२०२१ | ०५/०८/२०२१ | ०५/०८/२०२१ | २८/०८/२०२१ |
| २ | वास्तुशास्त्र-सत्र १ ते ८ (New) (२०१७-१८ पॅटर्न) | ३०/०७/२०२१ | ०३/०८/२०२१ | रु. १००/- (प्रती सत्र) | * रु. ८०/- | रु. ८०/- | नियमित रु. ९०० /- (प्रती सत्र)<br>रिपीटर रु.५००/- (प्रती सत्र) | ०३.०८.२०२१ | ०५/०८/२०२१ | ०५/०८/२०२१ | २८/०८/२०२१ |

**कोवीड-१९ चा प्रादुर्भाव पाहता, विद्यापीठाने विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन परीक्षा अर्ज व शुल्क जमा करण्याचे सुविधा विद्यापीठाच्या nmuj.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेली आहे. विद्यार्थ्यांना Online Payment Gateway/Debit/Credit Card इत्यादिंच्या माध्यमातून परीक्षा शुल्क हे Online भरण्यासाठी http://nmuj.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर Online Examination Form Submission या Title वर उपलब्ध आहे. सर्व संबंधितांनी तसेच विद्यार्थ्यांनी परिपत्रक क्र. ७६/२०२१,जा.क्र.उमवि/७-अ/माहे मे, जून,जुलै-२०२१/९१४/२०२१, दिनांक ०३/०५/२०२१ परिपत्रकातील पान क्र. ७ व ८ वर नमूद केलेल्या महत्वाच्या सुचनांचे कटाक्षाने अवलोकन करुन कार्यवाही करावी.**